Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 02 April 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०२ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत चर्चा आणि पारीत होण्यासाठी सादर केलं जाणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या सर्व घटक पक्षांनी तसंच काँग्रेसनंही आपल्या सर्व खासदारांना सभागृहात उपस्थित राहण्यासंदर्भात व्हिप जारी केलं आहे.

****

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. शाहू- फुले- आंबेडकर विनाअनुदानित आश्रम शाळा इथले आत्महत्या केलेले शिक्षक धनंजय नागरगोजे यांना न्याय देण्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या शिक्षकांनी अजित पवार यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा ताफा न थांबता पुढील नियोजित कार्यक्रम स्थळाकडे रवाना झाला. यानंतर शिक्षकांनी रस्ता रोको आंदोलन सुरू केलं होतं. जिल्हाधिकारी कार्यालयात अजित पवार यांच्या नियोजित बैठकीत शिक्षकांच्या शिष्टमंडळाची भेट घालून देण्याचं आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं.

****

देशात प्रत्येक ग्रामपंचायतीला वेगवान संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठीच्या भारत नेट प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या उर्वरित ग्रामपंचायतीपर्यंत संपर्क यंत्रणा प्रस्थापित करावी असे निर्देश, केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिले. मुंबईत काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी राज्य शासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीदरम्यान सांगितलं.

****

राज्य सरकारने महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळाची रूपरेषा जारी केली आहे. हे महामंडळ स्थापन केल्याने नगरिकांचं तसंच खाजगी क्षेत्रातल्या कंपन्यांचं सायबर गुन्ह्यापासून आणि संबंधित धोक्यांपासून संरक्षण होईल, असा दावा, राज्य सरकारने केला आहे. यापूर्वी सायबर गुन्हे विभाग राज्य पोलिसांच्या अधीन होता. यासाठी महामंडळ स्थापन करण्याला गेल्या महिन्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

महाराष्ट्र हे कलासंपन्न राज्य आहे, त्यामुळे इथली नाट्यगृहं कशी असावीत तसंच कलाकार आणि प्रेक्षकांना काय सुविधा असाव्यात याविषयी सर्वंकष नाट्यगृह धोरण येत्या दोन महिन्यात तयार करण्यात येईल, अशी घोषणा, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी केली. वर्धा इथं छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते काल बोलत होते. यावेळी साडेआठ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजनही करण्यात आलं.

****

राज्यात यंदाच्या २०२४-२५ या उन्हाळी हंगामात चार लाख पाच हजार ३४१ हेक्टरवर क्षेत्रावर पिकांच्या पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. तसंच बहुतांश पिकांच्या सरासरी क्षेत्रांहून अधिक पेरण्या पूर्ण झालेल्या असल्याने पिकांच्या उत्पादनातही वाढ होण्याचा कृषी आयुक्तालयाचा अंदाज आहे. गेल्या वर्षापेक्षा यंदा उन्हाळी पिकांच्या उत्पादनात वाढ होणार असल्याची माहिती, पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी दिली.

****

नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने फार्मास्युटिकल मेडिसिन क्षेत्रात विविध संशोधन आणि कौशल्य विकास उपक्रमांकरता विविध संस्थांसोबत नुकताच सामंजस्य करार केला. कुलगुरू माधुरी कानिटकर यांनी या सामंजस्य करारांच्या माध्यमामार्फत सिकलसेल, कुष्ठरोग, सर्पदंश यांसारख्या संशोधनांवर काम करणं शक्य होणार असल्याचं सांगितलं. नवीन फार्माकॉलॉजिकल तपासण्यांसाठी प्राण्यांचे मॉडेल, प्राण्यांचा ट्रान्सजेनिक वापर करून अधिक सुरक्षित औषधशास्त्र विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

हास्य कलाकार कुणाल कामरा याला मुंबई पोलिसांनी हजर राहण्यासंदर्भात तिसऱ्यांदा समन्स बजावलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह

टिप्पणी केल्याचा कामरा याच्यावर आरोप असून, त्याला १५ एप्रिलपर्यंत खार पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

****

केंद्रीय संरक्षण मंत्रालयाअंतर्गत राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने देशातल्या १३ विद्यापीठाच्या कुलगुरुंना 'कर्नल कमांडंट' पदवी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांना हा सन्मान घोषित झाला आहे. या सन्मानासाठी महाराष्ट्रातून दोन विद्यापीठाच्या कुलगुरुंचा समावेश असून, दापोली इथल्या डॉ.बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय भावे यांनाही ही पदवी जाहीर झाली आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या विष्णुपूरी प्रकल्पातून जलसंपदा विभागामार्फत रब्बीसाठी चार पाणी पाळ्या आणि उन्हाळी हंगामाकरता तीन पाळी पाण्याचं नियोजन कधीच घोषित करण्यात आलं नाही. ही माहिती चुकीची असून, २०२४-२५ साठी रबी हंगामाकरता तीन पाणी पाळ्या देण्यात येणार असल्याचं पाटबंधारे विभागानं स्पष्ट केलं आहे. शेतकऱ्यांनी त्यानुसार रब्बीचं नियोजन करावं, असं आवाहन विभागाने केलं आहे.

****

मराठवाड्यातल्या अनेक भागात अवकाळी पाऊस होत आहे. जालना शहरासह जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण असून, रात्रभरापासून पावसाची संततधार सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****